## नियमित दिवाणी दावा क्रमांक १७/२०२२ मधील
## निशाणी क्र. ७४ खालील आदेश
## MHRT080001452022

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०३ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला "एकतर्फा चौकशीचा" आदेश रद्द करण्यात येवुन त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात असे कथन आहे की, प्रतिवादी नं.०३ यांना व्यक्तीगतरित्या बजावणी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी नं.०३ यांना प्रस्तुत दाव्याबाबत माहिती मिळाली नसल्याने ते सदर दाव्याचेकामी हजर झालेले नाहीत. त्यामुळे त्यांचे विरुध्द एकतर्फा चौकशीचा आदेश झालेला आहे. सदरचा आदेश रद्द होऊन कैफियत न्यायाच्या दृष्टीने अभिलेखावर येणे आवश्यक व जरुरीचे आहे. तरी अर्ज मंजूर करण्यास विनंती करण्यात आली आहे. अर्जाच्या पृष्ठ्यर्थ नि.७५ अन्वये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

०३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करण्यात आले आहे की, नि.४१ वरील अर्जाप्रमाणे सदरचे प्रतिवादीचे त्यानेच नमुद केलेल्या पत्यावर नोंदणीकृत डाकव्दारे समन्सची बजावणी सन २०२३ मध्ये झाली आहे. त्यानंतर सुमारे दोन वर्षानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून विलंब का झाला याचे समर्पक कारण अर्जात नमुद नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करावे असे मत झाल्यास वादीला खर्च देण्याच्या आदेशावर तो मंजूर करण्यात यावा, असे म्हणणे सादर करण्यात आले आहे.

०४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

०५. अभिलेखावरुन प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई

हुकूमासाठी दाखल केल्याचे दिसून येते. दिनांक ०१/०९/२०२३ रोजी प्रस्तुत प्रतिवादीविरूध्द एकतर्फा चौकशीचा आदेश पारीत झालेला आहे. दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे, अर्जातील कारण गृहित धरुन अर्ज मंजूर केल्यास सदर प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर येवुन उभयपक्षकारांमधील वादाचे मुद्दे अंतिमतः गुणदोषावर निकाली काढणे सोपे जाईल. अर्ज मंजूर केल्यास वादीचे अपरीमित नुकसान होईल असे दिसून येत नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीकोनातुन अर्ज मंजूर करणे गरजेचे वाटते. परंतू, अर्ज मंजूर करताना वादीचे झालेले आर्थीक व वेळेचे नुकसान दुर्लक्षीत करुन चालणार नाही. सबब, अर्ज खर्चाच्या अटीवर मंजूर न्यायोचीत वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज निशाणी ७४ हा वादीला पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी रक्कम रुपये ५००/– इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. आदेशान्वये पूर्तता केल्यानंतर पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.03 16:12:40 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख,**

**जि. रत्नागिरी.**

**दि. ०३/०९/२०२५**

**देवरुख.**

-:CERTIFICATE:-

Order Below Exh.74 in R.C.S. No.17/2022

I affirm that the contents of this Pdf file are same words as per original file.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K.V. Vaje (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 03/09/2025 |
| Order signed by PO.on | :- | 03/09/2025 |
| Order uploaded on | :- | 03/09/2025 |